3 र्‍या वर्षात यशस्वी पदार्पण
आमच्यासोबत आपला प्रवास सुखाचा होईल..
विराज ट्रॅव्हल्स
प्रवाशांच्या सहकार्यामुळे विराज ट्रॅव्हल्सची यशस्वी वाटचाल,
सर्व ग्राहकांचे आभार !
पंकज गुंदेचा 9822496664 9403448649

दैनिक
मनोरंजनासह प्रबोधनासाठी...
epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो – अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

ईश्वर टी अॅण्ड नाष्टा सेंटर
संपुर्ण महाराष्ट्रातील खवैयांची आवडती चव
सावेडी उपनगरातील प्रेमदानचौकात
पोहे, समोसा, शाबुदाणा खिचडी
प्रो.प्रा. ईश्वर जायभाय- 70583 88547
प्रेमदानचौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर

• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४६४ वा • सोमवार, ता. ०८ डिसेंबर २०२५ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## इंडिगो कोसळली? हजारो उड्डाणे रद्द

### लाखो प्रवासी रस्त्यावर; सरकारचा हस्तक्षेप

**नवी दिल्ली । रयत समाचार**

देशातील सर्वात मोठी विमान कंपनी इंडिगो एअरलाइन्स सध्या अभूतपूर्व संकटात सापडली आहे. गेल्या चार दिवसांत कंपनीने २,५०० हून अधिक उड्डाणे रद्द केली असून, लाखो प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. नव्या पायलट ड्यूटी नियमांमुळे निर्माण झालेल्या कर्मचारीटंचाईला इंडिगोची 'लीन स्टाफिंग' धोरणे कारणीभूत ठरल्याचे समोर येत आहे. शनिवारी (६ डिसेंबर) देशभरात ३८५ तर रविवारी (७ डिसेंबर) सकाळपर्यंत ६५० उड्डाणे रद्द करण्यात आली. दिल्ली, मुंबई, बेंगलुरू, हैदराबाद, चेन्नई या प्रमुख विमानतळांवर हजारो प्रवासी तासन् तास अडकून पडले. काही ठिकाणी प्रवाशांनी संताप व्यक्त करीत निदर्शने केली. अनेकांनी लग्न, वैद्यकीय उपचार व महत्त्वाच्या बैठकी चुकवल्या.

कडक, इंडिगोला शो–कॉज नोटीस

विमानन नियामक संचालनालयाने इंडिगोचे मुख्य कार्यकारी अधिकारी पीटर एल्बर्स यांना शो–कॉज नोटीस बजावली आहे. तसेच काही नियमांत तात्पुरती सवलत दिल्याने कंपनीने १० डिसेंबरपर्यंत ९५ टक्के नेटवर्क पूर्ववत होईल, असा दावा केला आहे. मात्र, प्रवासी संघटना आणि पायलट युनियनने कंपनीच्या दीर्घकालीन मनुष्यबळ नियोजनावर कडाडून टीका केली आहे.


सरकारची तात्काळ कारवाई

केंद्रीय नागरी उड्डाण मंत्रालयाने सर्व विमान कंपन्यांना भाडेवाढीला लगाम घालण्याचे, तात्काळ परतावा देण्याचे व पुनर्बुकिंगसाठी अतिरिक्त शुल्क न आकारण्याचे आदेश दिले आहेत. एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसने ४ डिसेंबरपासूनच इकॉनॉमी भाड्यांना मर्यादा घातली आहे. रेल्वेनेही मुंबई–गोवा, मुंबई–नागपूर, बेंगलुरू–मुंबई अशा १४ विशेष गाड्या जाहीर केल्या आहेत. आर्थिक फटका इंडिगोच्या शेअरने गेल्या तीन दिवसांत १० टक्क्यांहून अधिक घसरण नोंदवली. बाजार विश्लेषकांनी कंपनीच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. इंडिगोने प्रवाशांची गैरसोय कमी करण्यासाठी अतिरिक्त कॉल सेंटर कर्मचारी, विशेष रिफंड डेस्क आणि सोशल मीडियावर सतत अपडेट्स देण्याची घोषणा केली आहे. तरीही संतप्त प्रवाशांचा रोष कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत.

## ...तर उपमुख्यमंत्रीपद रद्द करा- ठाकरे

**मुंबई । रयत समाचार**

राज्यातील नगरपालिका निवडणुका, मतदार याद्यांतील गैरव्यवस्था आणि विरोधी पक्षनेतेपदाचा प्रश्न यावरून शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी राज्य सरकारवर तीव्र निशाणा साधला. बूथ कॅप्चरिंगच्या पुढे जाऊन आता संपूर्ण निवडणुकाच 'कॅप्चर' करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. ठाकरे म्हणाले, ''मतदार याद्यांतील घोळ अत्यंत गंभीर आहे. सर्वोच्च न्यायालयाने जसं भटक्या कुत्र्यांवर स्वतःहून लक्ष दिलं, तसंच लोकशाहीच्या या प्रश्नावरही स्वयंसूचना घ्यावी. मतदार यादीतील चुका दुरुस्त होईपर्यंत कोणतीही निवडणूक घेऊ नये, अशी आमची सर्वोच्च न्यायालयाकडे मागणी आहे.''विधिमंडळात अद्याप विरोधी पक्षनेतेपद न दिल्याबद्दल ठाकरे यांनी सरकारवर



कायदेशीर प्रश्न उपस्थित केला. ''सरकारला एक वर्ष होत आले, तरीही दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेते नाही. हा राज्याच्या इतिहासातील अभूतपूर्व प्रकार आहे. जर विरोधी पक्षनेतेपद संविधानात नसल्याचे आपण सांगत असाल, तर उपमुख्यमंत्री हे पदही रद्द करा, कारण संविधानात त्याचीही तरतूद नाही,'' अशी थेट मागणी त्यांनी केली.उद्धव ठाकरे यांनी शेतकरी पॅकेजबाबतही मुख्यमंत्र्यांवर टीका केली. केंद्राने पॅकेज न दिल्याने राज्य सरकारची भूमिका उघडी पडल्याचे ते म्हणाले. ''ओला दुष्काळ ही संज्ञा नाही असे बोलून ओला दुष्काळ टाळला जात नाही. प्रस्ताव कधी जाणार? पैसे कधी मिळणार? शेतकऱ्यांच्या खात्यात निधी कधी जमा होणार? सरकारने याबाबत स्पष्ट उत्तर द्यावे,'' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना ठाकरे म्हणाले की, तीनही पक्षांचे नाव व चिन्ह वेगळे असले तरी त्यांचा 'मालक' एकच आहे. दिग्विजय सिंह यांच्या भेटीबाबत त्यांनी सांगितले की ती वैयक्तिक भेट होती.

## वृद्धांना अधिक आरामदायी, सन्मानपूर्वक वास्तव्य मिळावे- आ.चन्नराज हट्टीहोळी

### नागनूर वृद्धाश्रमाला भेट



**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

विधान परिषदेचे सदस्य चन्नराज हट्टीहोळी यांनी बसवन कुडची, देवराज अरस कॉलनी येथील नागनूर श्री शिवबसवेश्वर ट्रस्टच्या श्रीमती चन्नम्मा बसवंतिया हिरेमठ वृद्धाश्रमाला भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. हट्टीहोळी यांनी वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांची आरोग्यस्थिती, दैनंदिन काळजी, वैद्यकीय सुविधा, निवासव्यवस्था यांचा सविस्तर आढावा घेतला. समाजातील दुर्लक्षित व गरजू ज्येष्ठ नागरिकांना संस्थेकडून दिल्या जाणाऱ्या सेवांचे त्यांनी कौतुक केले. वृद्धांना अधिक आरामदायी आणि सन्मानपूर्वक वास्तव्य मिळावे यासाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.या वेळी महिला आणि बालविकास विभागाचे उपसंचालक चेतन कुमार एम.एन., सीडीपीओ सुमित्रा डी.बी., महिला कल्याण संस्थेच्या मानद सचिव वैजयंती चौगला, शक्ती सदन महिला पुनर्वसन केंद्राच्या सुरेखा पाटील, प्राचार्य किरण चौगला, कुमारी पूर्णिमा आणि कुमारी यमुना यांसह अन्य सदस्य उपस्थित होते.

## बीड–वडवणी रेल्वेमार्गावर पहिली इंजिन चाचणी यशस्वी



**बीड । रयत समाचार**

बीड ते वडवणी या नव्या रेल्वेमार्गावर आज प्रथमच रेल्वे इंजिनची चाचणी घेण्यात आली आणि ही चाचणी पूर्णतः यशस्वी ठरली. या महत्वपूर्ण टप्प्यानंतर आता १० आणि ११ डिसेंबर रोजी सीआरएस तपासणी तसेच स्पीड रेल्वे चाचणी घेण्यात येणार आहे. या मार्गावर पहिल्यांदाच रेल्वे इंजिन धावू लागल्याने परिसरातील नागरिकांनी मोठी गर्दी करून हा ऐतिहासिक क्षण कॅमेऱ्यात टिपला.

बीड–वडवणी या सुमारे ३० किलोमीटरच्या रेल्वे ट्रॅकचे काम पूर्ण झाले असून, बीडपरळी प्रकल्पातील हा सर्वात महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. शनिवारी नियोजित असलेली चाचणी तांत्रिक कारणांमुळे पुढे ढकलण्यात आली होती; मात्र आज इंजिन यशस्वीपणे धावल्याने या मार्गावर रेल्वे सेवा सुरू होण्याचा मार्ग अधिक सुकर झाला आहे.

तपासणीदरम्यान ट्रॅकची गुणवत्ता, ब्रेकिंग सिस्टीम, वेग सहन करण्याची क्षमता आणि सुरक्षाविषयक घटकांची पाहणी करण्यात आली. प्राथमिक चाचण्यांचे निकाल समाधानकारक असून स्पीड चाचणी पूर्ण झाल्यावर प्रवासी रेल्वे सुरू करण्याचा प्रस्ताव रेल्वे विभागाकडून अंतिम करण्यात येणार आहे.

या चाचण्यांच्या निमित्ताने रेल्वे प्रशासनाने परिसरातील नागरिक, शेतकरी आणि गुरेढोरे मालकांना ट्रॅकपासून दूर राहण्याचे आवाहन केले होते. बीडअहिल्यानगर मार्गानंतर आता बीडपरळी प्रकल्पही वेग पकडत असल्याने जिल्ह्याच्या रेल्वे स्वप्नपूर्तीकडे महत्त्वाचे पाऊल पडले आहे.



## 'हिंद-दी-चादर' पुस्तक, 'खालसाबंधन' वर्तमानपत्र, माहितीपट ट्रेलरचे प्रकाशन

**नागपूर । रयत समाचार**

श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या जीवनावर आधारित 'हिंद–दी–चादर श्री गुरू तेग बहादुर साहिब जी' या पुस्तकाचे आणि 'खालसाबंधन' वर्तमानपत्राचे प्रकाशन आज नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच त्यांच्या जीवनावर आधारित एआय तंत्रज्ञानातून तयार केलेल्या 'हिंद–दी–चादर' या माहितीपटाच्या ट्रेलरचेही लाँचिंग करण्यात आले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी गुरु तेग बहादूर साहिब यांचे जीवन पराक्रम, सहनशीलता आणि मानवतेसाठी केलेल्या बलिदानाचे प्रतीक असल्याचे सांगत त्यांच्या विचारांचा प्रसार नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याची गरज व्यक्त केली. कार्यक्रमास शीख समाजाचे पदाधिकारी, साहित्यप्रेमी उपस्थित होते.

## मुनिआ ज्ञानेश कुमार यांचा स्टॉकहोममध्ये प्रभावी संदेश

**स्टॉकहोम । रयत समाचार**

भारतीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी स्टॉकहोम येथील स्वीडिश इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल अफेयर्स (युआय) येथे 'इन्साईड इंडिया'स डेमॉक्रसी' या विषयावरील गोलमेज चर्चेत प्रभावी भाषण केले. याचबरोबर त्यांनी आंतरराष्ट्रीय आयडीयाच्या सदस्य राष्ट्र परिषदेच्या अध्यक्षपदाचा कार्यभार अधिकृतरीत्या स्वीकारला. चर्चेत स्वीडनच्या माजी परराष्ट्र मंत्री अॅन लिंडे यांचाही सहभाग होता. भारताच्या लोकशाही सामर्थ्याचा जागतिक मंचावर गौरव कुमार यांनी आपल्या भाषणात भारतातील निवडणुकीच्या प्रचंड व्यापाचे चित्रण करताना सांगितले की देशात ९०० दशलक्षांहून अधिक मतदार, २८ राज्ये आणि ८ केंद्रशासित प्रदेशांमध्ये लोकशाहीचा उत्सव साजरा करतात. २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकीतील आवाक्याचा उल्लेख करताना त्यांनी



सांगितले की ७४३ राजकीय पक्षांतील २० हजारांहून अधिक उमेदवार, २० दशलक्ष निवडणूक कर्मचारी, १० लाख बूथ लेव्हल अधिकारी आणि ५० लाख मतदान कर्मचारी या लोकशाही महायज्ञात सहभागी झाले. जागतिक पातळीवर भारताचे नेतृत्व आंतरराष्ट्रीय आयडीयाच्या अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारताना कुमार यांनी नमूद केले, भारताची जबाबदारी नवोन्मेषी, समावेशक व टिकाऊ लोकशाहीच्या ध्येयाने प्रेरित असेल. भारत, एक संस्थापक सदस्य म्हणून, आयडीयाच्या उपक्रमांमध्ये सातत्याने नेतृत्व करत आला आहे.

## कुमावत समाजात नवे नेतृत्व उदयास

### अंजली परदेशी महिला जिल्हाध्यक्षा; प्रवीण परदेशी शहराध्यक्ष




**अहमदनगर । रयत समाचार**


कुमावत (बेलदार) समाजसेवा महाराष्ट्र राज्य संघ, शाखा अहिल्यानगरच्या कार्यकारिणी निवड बैठकीत शहराध्यक्षपदी मर्चंट बँकेचे वरिष्ठ अधिकारी प्रवीण रामकृष्ण परदेशी तर महिला जिल्हाध्यक्षपदी अंजली प्रवीण परदेशी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. समाजकार्यातील सक्रिय योगदानाची दखल घेत सदस्यांनी एकमुखाने हा निर्णय घेतला. बैठकीत जिल्हा व शहर पातळीवरील विविध पदांसाठी पुढील निवडी जाहीर करण्यात आल्या : जिल्हाध्यक्ष : महेश जी छल्लारे. जिल्हा उपाध्यक्ष : संजय कुक्कडवाल. युवा जिल्हाध्यक्ष : शुभम राजवाळ. शहर युवा संघटना अध्यक्ष : सागर कुक्कडवाल. महिला आघाडी शहराध्यक्ष : जया अनावडे. महिला जिल्हा उपाध्यक्ष : आरती कुक्कडवाल

या बैठकीस समाजाचे भूषण श्रीकांत जी परदेशी, राज्याध्यक्ष भगवान दादा कुमावत, शिवसेना नेत्या सविता कुमावत, निलेश जी कुमावत, तसेच निवृत्त पोलीस उपअधीक्षक प्रल्हाद जी सारडीवाल यांसह मान्यवरांची उपस्थिती होती. बैठकीत समाजातील एकजूट, संघटन विस्तार, युवक व महिला सहभाग वाढ, तसेच आगामी उपक्रमांचे नियोजन यावर सविस्तर चर्चा झाली. नव्या कार्यकारिणीमुळे समाजात उत्साहाचे वातावरण असून पुढील काळात अधिक प्रभावी, रचनात्मक आणि सर्वसमावेशक कार्य होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## तिसऱ्या मराठी राजभाषा साहित्य संमेलनाध्यक्षपदी चंद्रकांत गावस

**पणजी । प्रभाकर ढगे**

'मराठी असे आमुची मायबोली' आणि 'गोमंतक मराठी अकादमी' यांच्या संयुक्त विद्यमाने तिसरे मराठी राजभाषा साहित्य संमेलन रविवार, ता. १८ जानेवारी २०२६ रोजी माशेल येथील नोनुज व्हिलेज सभागृहात पार पडणार आहे. या संमेलनाच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध साहित्यिक चंद्रकांत महादेव गावस यांची एकमताने निवड करण्यात आली आहे.



संमेलनाध्यक्ष निवड तसेच अन्य पूर्वतयारीचा आढावा घेण्यासाठी माशेल येथील नोनुज व्हिलेज सभागृहात बैठक घेण्यात आली. या बैठकीला संमेलन संयोजक प्रकाश भगत, कार्याध्यक्ष नोनू नाईक, कार्यवाह डॉ. मधू घोडकीरेकर, स्वागताध्यक्ष अॅड. विनायक नार्वेकर, रेखा डायस, गौरीश उदय नाईक, उदय ताम्हणकर, अशोक लोटलीकर, तुळशीदास सतरकर, विठ्ठल फडते, अशोक घाडी, बाबली कांदोळकर, हनुमंत मांज्रेकर आणि समन्वयक प्रभाकर ढगे आदी मान्यवर उपस्थित होते. बैठकीत साहित्यिक चंद्रकांत गावस यांच्या नावावर संमेलनाध्यक्ष म्हणून शिक्कामोर्तब करण्यात आले. चंद्रकांत गावस हे वाळपईसत्तरी येथील परिचित ज्येष्ठ साहित्यिक असून त्यांचे साहित्य वैविध्यपूर्ण आहे. त्यांच्या साहित्यप्रकारात कादंबरी, ललित लेखन, लोकसाहित्य आणि व्यक्तीचित्रांचा समावेश होतो. पाली, पिळगी, परीस, कलंकीनी, इदवास या त्यांच्या कादंबऱ्या लोकप्रिय आहेत. ललित लेखनात सावड, वळवाचा पाऊस, पानगळ ही पुस्तके विशेष उल्लेखनीय आहेत. हुंकार आणि जात्यावरील ओव्या हे त्यांच्या लोकसाहित्यावरील ग्रंथांपैकी प्रमुख मानले जातात. तर मळ आणि परिमळ ही उल्लेखनीय व्यक्तीचित्रे आहेत. त्यांच्या साहित्यिक योगदानाची दखल घेत त्यांना ना. सी. फडके पुरस्कार, गोवा हिंदू असोसिएशन मुंबईचा बा. भ. बोरकर पुरस्कार, सांगाती अकादमी बेळगावचा जीवनगौरव पुरस्कार तसेच कला अकादमी आणि गोमंतक मराठी अकादमी आदी संस्थांचे गौरव प्राप्त झाले आहेत.

मराठी राजभाषेचा सातत्याने आग्रह धरणाऱ्या आणि मराठी साहित्यसेवेत सातत्याने योगदान देणाऱ्या योग्य साहित्यिकाची अध्यक्षपदी निवड झाल्याने चंद्रकांत महादेव गावस यांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.

## कामत, नाईक, मुळवी यांना गोवा मराठी पत्रकार संघाचा पत्रकारिता पुरस्कार जाहीर

**पणजी । रयत समाचार**

गोवा मराठी पत्रकार संघातर्फे 'मराठी पत्रकार दिन' ६ जानेवारी २०२६ रोजी विशेष कार्यक्रमानिशी साजरा करण्यात येणार आहे. यंदाच्या सोहळ्यात पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तिघा ज्येष्ठ पत्रकारांचा गौरव करण्यात येणार असून संघाने वार्षिक पत्रकारिता पुरस्कार जाहीर केले आहेत.

दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार धर्मानंद कामत यांना 'भारत'कार हेगडे देसाई पुरस्कार, तर मागील पाच दशकांहून अधिक काळ मराठी पत्रकारितेला भरीव योगदान देणारे गोकुळदास मुळवी यांना 'भारतमित्र'कार ना.भा. नायक पुरस्कार जाहीर झाला आहे. ज्येष्ठ छायाचित्रकार सुनील नाईक यांना लक्ष्मीदास बोरकर स्मृती पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

मराठी पत्रकार दिनानिमित्त हा पुरस्कार सोहळा सायं. ४ वाजता इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा सभागृहात पार पडणार आहे. कार्यक्रमाला साहित्यप्रेमी व राज्याच्या शासकीय सेवेत अनेक वरिष्ठ पदे भूषविलेले माजी राज्य निवडणूक आयुक्त दौलत हवालदार प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार असून त्यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होईल. संघाने आयोजित केलेल्या दिवाळी अंक २०२५ स्पर्धेचे बक्षीस वितरणही याच वेळी होणार आहे.

या निमित्ताने ''तेथे कर माझे जुळती'' हा साहित्यिक व सांस्कृतिक मूल्यांनी समृद्ध असा विशेष कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. मराठी कवितेला समृद्ध करणारे 'तीन हात' मंगेश पाडगावकर, बा. भ. बोरकर आणि ग.दि. माडगूळकर यांच्या कवितांवर आधारित हा सादरीकरण सोहळा मुंबईच्या माणिक एंटरटेनमेंट संस्थेतर्फे सादर होणार आहे. कार्यक्रमाचे मुख्य सूत्रधार अतुल अरुण दाते असतील. 'आनंदयात्री' म्हणून परिचित असलेले प्रसाद कुलकर्णी कवींच्या कवितांचा परामर्श घेणार आहेत. गायक संगीतकार केतन पटवर्धन व गायिका वर्षा जोशी लोकप्रिय गीतांची सादरीकरणे करतील. ऐश्वर्या जोशी या कार्यक्रमाचे निवेदन करतील. हा कार्यक्रम इन्स्टिट्यूट मिनेझिस ब्रागांझा संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला असून आरबीएस खांडेपारकर समूह आणि गोवा पर्यटन विकास महामंडळ यांचे सहकार्य लाभले आहे.

# मोतीबिंदू, पडदा शस्त्रक्रिया महात्मा फुले जनआरोग्य योजनेत समाविष्ट करा

## जालिंदर बोरुडे यांची राज्य सरकारकडे मागणी

**अहमदनगर । रयत समाचार**

ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना डोळ्यांच्या आजारांवरील उपचार परवडणारे व्हावेत, यासाठी मोतीबिंदू आणि पडदा शस्त्रक्रिया महात्मा फुले जन आरोग्य योजनेत तातडीने समाविष्ट कराव्यात, अशी मागणी नेत्रदूत जालिंदर बोरुडे यांनी राज्य सरकारकडे केली आहे. नागपूर हिवाळी अधिवेशनात या विषयावर लोकप्रतिनिधींनी तारांकित प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधावे, असेही त्यांनी आवाहन केले असून, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन दिले असल्याचे त्यांनी सांगितले. महात्मा फुले जन आरोग्य योजनेत १५०० पेक्षा जास्त आजार आणि शस्त्रक्रिया समाविष्ट असूनही, मोतीबिंदू आणि पडदा शस्त्रक्रिया अद्यापही योजनेबाहेर आहेत. ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावरील रुग्णांना या शस्त्रक्रियांची आवश्यकता असते. उपचाराचा खर्च २० ते ८० हजार रुपयांपर्यंत जात असल्याने आर्थिक अडचणींमुळे अनेक रुग्ण शस्त्रक्रिया पुढे ढकलतात किंवा टाळतात. वेळेवर उपचार न झाल्याने अनेकांना कायमचा दृष्टिदोष किंवा अंधत्व येत असल्याचे उदाहरणे मोठ्या प्रमाणात दिसून येतात. खासगी रुग्णालये योजनेच्या बाहेर असल्याने रुग्णांकडून थेट शुल्क आकारले जाते.



बोरुडे म्हणाले, "सर्वसामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना एवढा खर्च परवडणारा नाही. अनेकांना सावकाराकडून कर्ज घ्यावे लागते किंवा उधारीवर उपचार करावे लागतात. शासनाने दुर्बल घटकांना आधार देण्यासाठी मोतीबिंदू व पडदा शस्त्रक्रिया महात्मा फुले जन आरोग्य योजनेत तातडीने समाविष्ट कराव्यात." काही सामाजिक संस्था आणि मंडळे मोफत शिबिरे घेऊन मदत करतात, मात्र रुग्णसंख्येच्या तुलनेत ही मदत अत्यंत अपुरी आहे. मोतीबिंदू हा देशातील सर्वाधिक सामान्य नेत्रविकार असून वेळेवर उपचार न झाल्यास कायमस्वरूपी दृष्टिदोषाचा धोका वाढतो. त्यामुळे या शस्त्रक्रिया सरकारी योजनेतूनच मोफत उपलब्ध होणे अत्यावश्यक आहे. यामुळे हजारो कुटुंबांवरील आर्थिक ताण मोठ्या प्रमाणात कमी होईल, असेही बोरुडे यांनी नमूद केले.

# डॉ.आंबेडकरांनी राज्यघटनेच्या माध्यमातून एकसंघ ठेवण्याची किमया केली- ॲड. आगरकर



**अहमदनगर । रयत समाचार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला जगातील सर्वोत्तम राज्यघटना दिली असून या राज्यघटनेच्या माध्यमातून भारताने प्रजासत्ताक, लोकशाही आणि बलशाली राष्ट्र म्हणून प्रगतीची वाटचाल सुरू ठेवली. विविधतेने भरलेल्या देशाला राज्यघटनेच्या एका सूत्रात गुंफून एकसंघ ठेवण्याची किमया बाबासाहेबांनी केली, असे प्रतिपादन श्री विशाल गणेश मंदिर देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांनी केले. शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणेश मंदिराच्या वतीने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त मार्केट यार्ड येथील त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी देवस्थानचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर, उपाध्यक्ष पंडित खरपुडे, सचिव अशोक कानडे, पांडुरंग नन्नवरे, विजय कोथिंबिरे, रंगनाथ फलसौंदर, बापूसाहेब एकाडे, चंद्रकांत फुलारी, प्रा. माणिक विधाते, गणेश राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. या प्रसंगी पंडित खरपुडे म्हणाले, "डॉ. बाबासाहेबांच्या विचारांतच देशाचे आणि संपूर्ण मानवजातीचे कल्याण दडलेले आहे. त्यांचे मानवकल्याणाचे विचार घराघरांत पोहोचले पाहिजेत. देशाची राज्यघटना, एकता, समता आणि बंधुत्वाची भावना अधिक दृढ व्हावी यासाठी सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे."

# अविनाश घुले यांच्या प्रयत्नांना यश; स्ट्रीटलाईटचे काम सुरू

**अहमदनगर । रयत समाचार**



प्रभाग क्र. १३ मधील महत्त्वाचा डीपी रस्ता पूर्ण झाला असला तरी रस्त्यावर स्ट्रीट लाईटचा अभाव असल्याने नागरिकांना अंधारात प्रवास करण्याची वेळ येत होती. या परिस्थितीची गंभीर दखल घेत माजी स्थायी समिती सभापती अविनाश घुले व नगरसेवक विपुल शेटीया यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. पाहणीनंतर काही तासांतच प्रकाशयोजनेचे काम सुरू करण्यात आले.

रस्त्याचे काम पूर्ण होऊनही प्रकाशयोजना न झाल्याने महिला, विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांना रात्रीच्या वेळी मोठा त्रास सहन करावा लागत होता. नागरिकांकडून मिळालेल्या तक्रारींच्या आधारे घुलेशेटीया यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने निर्देश दिले. परिणामी एलईडी लाईट फिटिंग, वायरिंग आणि खांब उभारणीचे काम युद्धपातळीवर सुरू झाले आहे. नगरसेवक अविनाश घुले म्हणाले, "प्रभाग १३ मधील प्रत्येक नागरिक सुरक्षित प्रवास करावा, ही आमची प्राथमिक जबाबदारी आहे. रस्ता झाला म्हणजे काम संपले नाही; प्रकाशयोजना तितकीच महत्त्वाची आहे. तक्रारी मिळताच आम्ही तातडीने पाहणी करून प्रशासनाला निर्देश दिले. काही दिवसांत संपूर्ण रस्ता उजळून निघेल." विपुल शेटीया म्हणाले, "हा रस्ता रोज हजारो नागरिक वापरतात. अंधारामुळे अपघातांचा धोका वाढत होता. अनेकांनी थेट आमच्याशी संपर्क साधून अडचणी मांडल्या. कोणताही प्रश्न प्रलंबित राहू नये म्हणून आम्ही तत्काळ हस्तक्षेप केला. आता काम वेगाने सुरू असून प्रकाशयोजनेमुळे नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

## मनपाची वाढीव घरपट्टी; विनय वाखुरे यांची नगरविकास विभागाकडे धाव

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील घरांची मोजणी दिल्लीतील कंत्राटदारामार्फत करण्यात आली असून या मोजणीदरम्यान कोणता निकष वापरण्यात आला याची माहिती नागरिकांना देण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर असंख्य नागरिकांना वाढीव रकमेची घरपट्टी आकारण्यात आल्याच्या तक्रारी समोर आल्या आहेत. या संदर्भात नागरिकांना हरकती दाखल करण्याच्या सूचना दिल्या असल्या तरी शहरात जेष्ठ नागरिक आणि महिलांची संख्या मोठी असल्याने त्यांना हरकती प्रक्रिया पूर्ण करणे शक्य नाही, असे विनय वाखुरे यांनी सांगितले. अनेक नागरिकांचे उत्पन्न मर्यादित असल्याने वाढीव घरपट्टीचा भार त्यांच्यावर पडू नये, अशीही त्यांनी भावना व्यक्त केली.



वाढीव घरपट्टीविरोधात नगर विकास विभागाकडे तक्रार दाखल करण्यात आल्याचे वाखुरे यांनी सांगितले. नागरिकांच्या अडचणींचा विचार करून महानगरपालिकेने या निर्णयाचा पुनर्विचार करावा तसेच उत्पन्नवाढीचे पर्यायी मार्ग शोधावेत, अशी मागणी त्यांनी केली आहे. या प्रकरणी नगर विकास विभागाने हस्तक्षेप करून आवश्यक सहकार्य करावे, असेही वाखुरे यांनी सांगितले.

# सहकारनगर येथे सर्वरोग निदान शिबिर ; नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहमदनगर । रयत समाचार**

प्रभाग क्र. ३ सहकारनगर, तीन मंदिर परिसरात आज आयोजित करण्यात आलेल्या मोफत सर्व रोग निदान शिबिराला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. विविध वैद्यकीय तपासण्या, नेत्र तपासणी, मोतीबिंदू निदान, चष्मा वितरण, सांधेदुखीगुडघेदुखी तपासणी तसेच सर्वसाधारण आजारांवरील उपचार यांचा लाभ मोठ्या संख्येने नागरिकांनी घेतला.



या उपक्रमासाठी साईमहालक्ष्मी हॉस्पिटल आणि अंजली चष्मावाला यांच्या वैद्यकीय तज्ञांनी सेवा प्रदान केली. शिबिराचे नियोजन आणि आयोजन सुरळीत पार पाडण्यासाठी स्थानिक कार्यकर्त्यांचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. कार्यक्रमास शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे उपसचिव विक्रम राठोड, तसेच शेखर तुंगार, सचिन खटावकर, राजेंद्र भगत, अंबादास शिंदे, संदीप थोम्बरे, गिरीश हांडे, प्रथमेश महिंदरकर, राज गोरे, वैभव सांगळे, मोहित मिश्रा, रितेश गायकवाड, प्रशांत पाटील, रामेश्वर सोलट, प्रशांत दरकुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

शिबिराच्या यशस्वीतेबद्दल बोलताना आयोजक योगीराज गाडे म्हणाले, "नागरिकांच्या आरोग्यसेवेसाठी असे उपक्रम नियमितपणे राबवले जातील. सहकारनगर आणि प्रभाग क्र. ३ मधील नागरिकांनी दाखवलेला प्रतिसाद प्रेरणादायी आहे. समाजाच्या आरोग्यवृद्धीसाठी आपण सर्वांनी एकत्रितपणे अधिक प्रभावी काम करणार आहोत." नागरिकांकडून मिळालेल्या सकारात्मक प्रतिसादामुळे भविष्यात आणखी व्यापक आरोग्यसेवा उपक्रम राबवण्याची तयारी असल्याचेही त्यांनी सांगितले.

# नेक्स्ट लेवल फिटनेस खेळाडूंचे पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत घवघवीत यश

**अहमदनगर । रयत समाचार**



नेक्स्ट लेवल फिटनेसच्या खेळाडूंनी विविध पॉवर लिफ्टिंग आणि बेंच प्रेस स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत राज्यभरात आपली दमदार छाप सोडली आहे. अनेक स्पर्धांत या खेळाडूंनी पदकांची लयलूट करत नेक्स्ट लेवल फिटनेसचा झेंडा बुलंद केला आहे. पुणे येथे झालेल्या चौथ्या राज्यस्तरीय पॅरा ऑलिम्पिक बेंचप्रेस स्पर्धेत अस्मिर सय्यद (जहागिरदार) यांनी ८८ किलो वजनी गटात तब्बल १२६ किलो वजन उचलत सुवर्णपदक पटकावले. त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीच्या जोरावर उत्तराखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्यांची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. मुंबईत पार पडलेल्या राज्यस्तरीय बेंच प्रेस स्पर्धेत कु. कल्याणी वाघमारे हिने सब-ज्युनियर गटात क्लासिक व इक्विप या दोन्ही प्रकारात दोन सुवर्ण पदके मिळवली. दमदार प्रदर्शनाबद्दल तिला स्ट्राँग वुमन हा मानाचा किताबही देण्यात आला. आगामी हरियाणा राष्ट्रीय बेंच प्रेस चॅम्पियनशिपसाठी तिची निवड झाली आहे. नुकत्याच झालेल्या जिल्हा शालेय पॉवर लिफ्टिंग स्पर्धेत नेक्स्ट लेवल फिटनेसच्या जान्हवी गायकवाड, अर्णव इंगळे, साहिल कासोटे, सार्थक गाडे, सोहम गड्डम आणि श्रीकृष्ण सूर्यवंशी यांनी आपल्या वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावत विभागीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली.

पुणे विद्यापीठीय स्पर्धेत कु. हर्षा गाडे हिने आपल्या वजनी गटात विजेतेपद पटकावत पहिला क्रमांक मिळवला. नेक्स्ट लेवल फिटनेस जिममध्ये सर्व विजेत्या खेळाडूंचा सत्कार महाराष्ट्र पॉवर लिफ्टिंग संघटनेचे संयुक्त सचिव डेव्हिड मकासरे आणि महाराष्ट्र राज्य पॅरा ऑलिम्पिक संघटनेचे नवनिर्वाचित अध्यक्ष विलास दवणे यांच्या हस्ते करण्यात आला. खेळाडूंना प्रशिक्षक विजय कनोजिया आणि ओंकार गुर्रम यांचे मार्गदर्शन लाभले. नेक्स्ट लेवल फिटनेसचे हे राज्य व राष्ट्रीय स्तरावरील यश स्थानिक क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# 'शाळा बंद' आंदोलन यशस्वी- सुनील गाडगे

**अहमदनगर । रयत समाचार**

शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी ५ डिसेंबर रोजी पुकारण्यात आलेल्या राज्यव्यापी 'शाळा बंद' आंदोलनाला जिल्हाभरातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकाळपासून अनेक शाळांमध्ये अध्यापन पूर्णपणे बंद ठेवत शिक्षक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले. संघटनांच्या समन्वय समितीच्या नेतृत्वाखाली शांततापूर्ण मार्गाने रॅली काढण्यात आली आणि शासनाविरोधात जोरदार घोषणा देण्यात आल्या. या आंदोलनात शिक्षक भारती संघटनेने महत्त्वपूर्ण सहभाग नोंदवला. राज्य सचिव सुनील गाडगे म्हणाले, "शिक्षकांवर सक्तीची टीईटी, अन्यायकारक संचमान्यता धोरण, अशैक्षणिक कामांचा वाढता बोजा आणि अनेक वर्षे प्रलंबित असलेल्या मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करत आहे. शिक्षकांच्या संयमाचा अंत झाला असून न्याय मिळेपर्यंत आंदोलन सुरू राहील." शिक्षकांना अशैक्षणिक कामांपासून मुक्त करून शैक्षणिक कार्यावर लक्ष केंद्रित करण्याची मागणी पुन्हा एकदा बुलंद करण्यात आली. आंदोलनात जिल्हा सचिव विजय कराळे, विजय लंके, आनंद झरेकर, महिला जिल्हाध्यक्ष आशा मगर, कार्यवाह संजय भुसारी, कैलास जाधव, नवनाथ घोरपडे, रामराव काळे आदी उपस्थित होते.

दैनिक रयत समाचारचा ख्रिसमस विशेषांक
गुरूवार, ता.२५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होत आहे

ख्रिसमस विशेषांक

अंकासाठी लेख, माहिती, जाहीराती पाठवाव्यात

अतिथी संपादक
सॅम्युअल वाघमारे
8788412780

संपादक
भैरवनाथ वाकळे
8805401800

रयत समाचार महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक

जाहीरात पाठविण्यासाठी संपर्क क्रमांक

भैरवनाथ- ८८०५४०१८००, दिपक- ७७७४००१८००,
तुषार- ७९७२३४४४७४, पंकज-९८२२४९६६६४

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

दैनिक रयत समाचार
अहमदनगर जिल्हा आवृत्तीसाठी...
त्वरित नियुक्त करणे आहेत
१४ तालुका प्रतिनिधी, १४ शहर प्रतिनिधी, १५ प्रेस फोटोग्राफर, १४ तालुक्यात किमान ५ ते ७ ग्रामीण वार्ताहर.
अनुभवींना प्राधान्य!
इच्छुकांनी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर सात दिवसाच्या आत मानधनाच्या अपेक्षेसह मा. संपादक यांच्या नावे अर्ज करावा अर्ज या क्रमांकावर व्हॉटसअप करावा : 8805401800
आम्ही काय देणार
पत्रकार म्हणून निवड झाल्यानंतर नियुक्तीपत्र, (Appointment letter) दैनिकाचे ओळखपत्र (PRESS I. Card)
एकाच वेळी प्रिंट व डिजिटल मिडियात काम करण्याची संधी.

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

# गुरुवरील विश्वास जीवनात हमखास यश देतो– डॉ. एस. बी. निमसे

## डॉ. मिश्रा यांच्या 'द हार्बिंजर' गौरवग्रंथाचे प्रकाशन




**पुणे । रयत समाचार**

''जीवनात योग्य गुरूची निवड आणि त्या गुरुवरील अढळ विश्वास मनुष्याला नक्कीच यशस्वी बनवतो,'' असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि लखनौ विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. बी. निमसे यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ. देबेंद्रनाथ मिश्रा यांच्या ६५व्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या बहुआयामी कार्यावर आधारित 'द हार्बिंजर' या गौरवग्रंथाच्या प्रकाशन सोहळ्यात ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. एस. पी. काणे तसेच पुण्यातील अबेदा इनामदार महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शैला बुटवाला यांनी विशेष उपस्थिती दर्शवली. महाराष्ट्रातील विविध नामवंत विद्यापीठांतील आजी-माजी प्राध्यापक, संशोधक, डॉक्टर, साहित्यिक, प्रशासकीय अधिकारी तसेच डॉ. मिश्रा यांचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. डी. एन. मिश्रा यांच्या जीवनप्रवासावर आधारित माहितीपटाने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला आणि 'द हार्बिंजर' या गौरवग्रंथाचे औपचारिक प्रकाशन झाले. डॉ. एस. पी. काणे यांनी डॉ. मिश्रा यांच्या ज्ञान, नेतृत्व आणि संसाधनांचा सदुपयोग करून विद्यार्थ्यांच्या हितासाठी त्यांनी केलेल्या कार्याची माहिती दिली. तर प्राचार्या डॉ. शैला बुटवाला यांनी मिश्रा यांच्या व्यक्तिमत्वातील विशेष गुणांनी महाविद्यालयाच्या विकासास कसा हातभार लावला, याची उजळणी केली. ''आजचा कार्यक्रम हा शैक्षणिक गुणवत्तेच्या सन्मानाचा आहे,'' असे गौरवोद्गार प्रमुख पाहुणे डॉ. एस. एन. पठाण यांनी काढले. 'द हार्बिंजर' या ग्रंथात विविध विषयांवरील संशोधनपर लेखांसह डॉ. मिश्रा यांच्या शैक्षणिक, संशोधन व प्रशासकीय योगदानाचा व्यापक आढावा घेणारे लेख, आठवणी आणि विद्यार्थी मनोगते समाविष्ट आहेत.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. नितीन आर. साळवे आणि डॉ. कोमल एस. गोमारे यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. विहंग पाटील यांनी मानले.



# चारित्र्य हाच माणसाचा खरा दागिना– जगदीश महाराज

## भोंदे महाराज पुण्यस्मरण सप्ताह

**नगर तालुका । रयत समाचार**

पिंपळगाव माळवी येथे हभप बाळकृष्ण महाराज भोंदे यांच्या चतुर्थ पुण्यस्मरण सप्ताह सोहळ्याला शुक्रवार, ता. ५ डिसेंबर उत्साहात प्रारंभ झाला. भक्तिमय वातावरणात सुरू झालेल्या या सप्ताहाला परिसरातील भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. रविवारी झालेल्या दुसऱ्या दिवसाच्या कार्यक्रमात संत तुकाराम महाराजांच्या ''भक्त ऐसे जाणा जे देही उदास, गेले आशापासून निवारुनी'' या अभंगावर हभप जगदीश महाराज जोशी (त्र्यंबकेश्वर) यांनी कीर्तन सेवा केली. खरा भक्त तोच जो देहभाव, अहंकार, उदासी आणि दुःख त्यागून विठ्ठलमय होतो. ''ज्याच्या ठायी मीपणा नाही, त्यालाच खरा संत म्हणता येईल. कलियुगात खरे संत भेटणे कठीण झाले आहे, चारित्र्य हाच माणसाचा खरा दागिना आहे,'' असे त्यांनी कीर्तनातून सांगितले. सप्ताहकाळात हभप पांडुरंग महाराज घुले, हभप जगदीश महाराज जोशी, हभप दत्तात्रय महाराज जगताप, हभप तुकाराम महाराज जेऊरकर, हभप भीमाशंकर गुरुजी, हभप हनुमंत महाराज सवासे, हभप डॉ. नारायण महाराज जाधव व हभप रामभाऊ महाराज राऊत या मान्यवरांची कीर्तन सेवा होणार आहे. या सप्ताहात दररोज सायंकाळी महाप्रसाद वाटप होत असून परिसरातील हजारो भाविक प्रसाद व कीर्तन सेवेचा लाभ घेत आहेत.

## सुनील सोनवणे यांचे निधन



**नेवासा । विजय खंडागळे**

हिंगोणी येथील सेवा सोसायटीचे विद्यमान संचालक सुनील आबासाहेब सोनवणे (वय ५३) यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. सुनील सोनवणे हे मुळा सहकारी साखर कारखान्यात कार्यरत होते. त्यांच्या पश्चात आई-वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, भाऊ, दोन बहिणी असा परिवार आहे. ते दिवंगत आबासाहेब सोनवणे यांचे चिरंजीव, अनिल सोनवणे यांचे ज्येष्ठ बंधू आणि तेजस सोनवणे यांचे वडील होत. त्यांच्या अचानक निधनाने समाज, सहकारी क्षेत्र तसेच हिंगोणी व परिसरातील नागरिकांत दुःखाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# एचएसआरपी केंद्रांकडून लूटमार, परिवहन विभागाकडून थेट कारवाई

## ७७ लाख वाहनांना एचएसआरपी

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

राज्यातील जुनी वाहने उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक नंबर प्लेट (एचएसआरपी) बसवणे अनिवार्य करण्यात आले. अनेक वेळा यासाठी मुदतवाढ देखील देण्यात आली. दरम्यान, एचएसआरपी बसवणाऱ्या केंद्रांकडून वाहनचालकांची लुटमार सुरु असल्याचे

> **दाद ना फिर्याद**
>
> अहो कसं.....सरकार सांगेल तसं, याप्रमाणे मनाला येईल तशा प्रकारे या एचएसआरपी प्लेट सरकारने सर्वसामान्य नागरिकांवर बसवण्याचा अघोरी निर्णय घेतला आहे. ही प्लेट बसविल्यामुळे सर्वसामान्य वाहनधारकांचा कोणता फायदा झाला ही बाब सरकारही सांगू शकणार नाही. संपूर्ण राज्यभरात या निर्णयामुळे सरकारबद्दल प्रचंड नाराजी आहे.
>
> **सुनील मुथा,**
> **अध्यक्ष टॅक्सी असोसिएशन, बेलापूर**

समोर आले. काही केंद्रांकडून वाहनचालकांकडून अतिरिक्त शुल्क आकारल्याच्या तक्रारी परिवहन विभागाकडे आल्या आहेत. परिवहन आयुक्तालयाकडून मिरा-भाईंदर परिसरातील मिश्रा मीटर्स या फिटमेंट केंद्रावर थेट कारवाई करत टाळे ठोकण्यात आले.

सन २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी अर्थात एचएसआरपी बसवण्यासाठी परिवहन विभागाने ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र अनेक वाहन चालकांकडून फिटमेंट केंद्रावर जास्त रकमेची मागणी केल्याच्या तक्रारी परिवहन विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार परिवहन विभागाने तपासणी सुरू केली आहे.

मिरा-भाईंदरमध्ये मिश्रा फिटमेंट केंद्रावर ५० रुपये अतिरिक्त आकारणी करत असल्याची तक्रार परिवहन आयुक्तालयाकडे प्राप्त झाली होती. त्यानुसार केंद्रावर प्रत्यक्ष पाहणी केल्यावर तक्रारीत तथ्य दिसून आले. संबंधित फिटमेंट केंद्रावरून 'एचएसआरपी' बसवण्याची प्रक्रिया थांबवण्यात आली असून त्याचे केंद्र बंद करण्यात आले आहे. अधिक रक्कम आकारणाऱ्या राज्यातील तीन केंद्रांवर आतापर्यंत कारवाई करण्यात आली आहे. सध्या राज्यातील ७७ लाख वाहनांना एचएसआरपी बसवण्यात आली आहे. अपघातग्रस्त, गुन्ह्यात जमा झालेल्या, भंगारात काढलेल्या गाड्यांच्या 'एचएसआरपी'बाबत स्पष्ट अशी कोणतीही अद्याप तरतूद नाही.

# महावीर कलादालनात 'साहित्यनगरी' ग्रंथप्रदर्शन सुरू

### १० ते ५० टक्के सवलतींसह ग्रंथमेजवानी




**अहमदनगर । रयत समाचा**

**पुण्यातील 'साहित्यनगरीच्या वतीने मराठी व इंग्रजी पुस्तकांचे भव्य प्रदर्शन व विक्री आयोजित करण्यात आली असून, विविध प्रकारच्या साहित्यप्रकारांवरील हजारो पुस्तकांचा खजिना वाचकांसाठी खुला झाला आहे. १० ते ५० टक्क्यांपर्यंत आकर्षक सवलती दिल्याने पुस्तकप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळत आहे, अशी माहिती संचालक नवनाथ व शिवाजी भावड यांनी दिली.**

अधिक माहिती देताना भावड म्हणाले, या प्रदर्शनात कथा, कादंबरी, धार्मिक, ऐतिहासिक, बालवाङ्मय, पाककला, आरोग्य, संदर्भग्रंथ, शालेय व स्पर्धा परीक्षांची पुस्तके यांसह विविध प्रकारचे साहित्य उपलब्ध आहे. प्रसिद्ध लेखकांची लोकप्रिय पुस्तकेही खास किमतीत विक्रीस ठेवण्यात आली आहेत. स्थानिक लेखकांचीही पुस्तके येथे विक्रीस उपलब्ध आहेत.

'छावा, श्रीमान योगी, ययाती, अपरिपूर्ण, युगंधर, एक होता कार्वर, बुध्दभूषण, मृत्युंजय, शिवचरित्र, ॲटोमिक हॅबिट्स, आमचा बाप अन् आम्ही, रिच डॅड पूअर डॅड, रावण, द अल्केमिस्ट, इंड्स्टेड ट्रेडिंग' यांसारखी नामांकित पुस्तके वाचकांना विशेष सवलतीत उपलब्ध होत आहेत. प्रदर्शनस्थळी विविध प्रकाशनांची नवी, चर्चित तसेच क्लासिक पुस्तके मोठ्या प्रमाणावर मांडण्यात आली असून, वाचकांकडून देखील या उपक्रमाचे स्वागत होत आहे. हे प्रदर्शन महावीर कलादालन, माळीवाडा बस स्थानकाजवळ, अहिल्यानगर येथे भरविण्यात आले असून, अधिक माहितीसाठी साहित्यनगरीचे संचालक शिवाजी भावड ९०९६७३२६५० आणि नवनाथ भावड ९८२२७८५८०१ यांना संपर्क साधावा.

# नवजीवन पतसंस्थेत महापरिनिर्वाण दिन साजरा



**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

आधुनिक आणि प्रगतशील राष्ट्राच्या उभारणीत मोलाचे योगदान देणारे भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ता. ६ डिसेंबर १९५६ रोजी निधन झाले. त्यांच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी देशभर हा दिवस महापरिनिर्वाण दिन म्हणून पाळण्यात येतो. १४ ऑक्टोबर १९५६ रोजी डॉ. आंबेडकरांनी बौद्ध धर्म स्वीकारला होता. त्यामुळे त्यांच्या पुण्यतिथीसाठी बौद्ध परंपरेतील 'महापरिनिर्वाण' हा शब्द वापरला जातो. नवजीवन मागासवर्गीय पतसंस्थेच्या वतीने महापरिनिर्वाण दिनानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटनेचे जिल्हा उपाध्यक्ष माधव बनसुडे आणि महावीर पटवा यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. या वेळी महावीर पटवा, माधव बनसुडे, डेबरे, संदीप ढवळे यांनी मनोगत व्यक्त करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन केले. कार्यक्रमाला संस्थेचे चेअरमन, व्हा. चेअरमन तसेच संचालक उपस्थित होते.

# सुशांत जावळे यांची सहाय्यक रासायनिक विश्लेषकपदी निवड



**कोपरगाव । किसन पवार**

तालुक्यातील सोनेवाडी येथील सुशांत दिगंबर जावळे यांनी कठीण परिस्थिती, आर्थिक अडचणी आणि मर्यादित साधनांवर मात करत राज्य न्यायवैद्यक प्रयोगशाळा, मुंबई येथे सहाय्यक रासायनिक विश्लेषक या महत्त्वाच्या पदावर निवड मिळवली असून त्यांच्या या यशामुळे सोनेवाडी गावाचा अभिमान अधिक उंचावला आहे. शेतकरी कुटुंबातील सुशांत यांचा शिक्षणप्रवास संघर्षमय होता. शेती करून मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करणारे वडील दिगंबर जावळे आणि सर्व अडचणींतून मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणारी आई या दोघांच्या कष्टामुळे सुशांत यांनी गावातील कर्मवीर शंकरराव काळे विद्यालयात दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. रसायनशास्त्रातील आवडीमुळे त्यांनी पदवी व पदव्युत्तर शिक्षणात उत्तम कामगिरी केली.

उच्च शिक्षणानंतर सुशांत यांना हैदराबाद येथील संशोधन व विकास विभागात आकर्षक पगाराची नोकरी मिळाली होती. मात्र शासन सेवेत वैज्ञानिक म्हणून योगदान देण्याचे स्वप्न मनात ठेवून त्यांनी स्थिर नोकरीचा त्याग करण्याचा धाडसी निर्णय घेतला. अभ्यासाला पुन्हा सुरुवात करून त्यांनी भरती प्रक्रियेतील लेखी परीक्षा व मुलाखत या दोन्ही टप्प्यांत उल्लेखनीय यश संपादन केले. सुशांत यांच्या निवडीची घोषणा होताच सोनेवाडीमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. ''कुठल्याही परिस्थितीत आई-वडिलांनी माझा आत्मविश्वास कधी कमी होऊ दिला नाही. त्यांच्या पाठिंब्यामुळेच हे यश शक्य झाले,'' असे सुशांत यांनी सांगितले.

मर्यादित साधनांतही जिद्द, सातत्य आणि मेहनतीच्या बळावर मोठे लक्ष्य साध्य करता येते, याचे प्रेरणादायी उदाहरण सुशांत जावळे यांनी घालून दिले आहे. न्यायवैद्यक प्रयोगशाळेतून समाजसेवेत योगदान देण्याचा त्यांचा निर्धार आता अधिक दृढ झाला आहे. सुशांत यांच्या या यशाबद्दल कोपरगावचे आमदार आशुतोष काळे यांनी अभिनंदन केले आहे.

# हिवरगाव पावसा येथे महामानवास अभिवादन

**संगमनेर । नितीनचंद्र भालेराव**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६९व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त तसेच आद्यनृत्यांगणा नामचंद पवळा भालेराव हिवरगावकर यांच्या ८६व्या स्मृतिदिनानिमित्त ग्रामपंचायत हिवरगाव पावसा येथे अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी महान व्यक्तिमत्त्वांना आदरांजली अर्पण केली. कार्यक्रमात भिमशाहीर मधुकर भालेराव आणि गायक हरिचंद्र भालेराव यांनी सुमधुर भीमगीतांच्या माध्यमातून महापुरुषांना मानवंदना दिली. तसेच आद्यनृत्यांगणा पवळा हिवरगावकर यांना कलेच्या अनोख्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे प्रदेशाध्यक्ष (उपाध्यक्ष) श्रीकांत भालेराव यांच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले.

या वेळी वृक्षमित्र गणपत पावसे म्हणाले, ''महिलांच्या न्यायहक्कासाठी आणि ओबीसींच्या अधिकारांसाठी न्याय न मिळाल्याने मंत्रीपदाचा




राजीनामा देणारे जगातील एकमेव नेते म्हणजे विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर. भारतीय राज्यघटनेमुळे देश प्रगतीच्या वाटेवर आहे. आज विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक सुविधा या बाबासाहेबांची देण आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासातून गावाचे नाव उज्ज्वल करावे,'' असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की, ''हिवरगाव पावसा येथील आद्यनृत्यांगणा पवळा भालेराव यांचे कलाक्षेत्रातील योगदान अमूल्य आहे. १९व्या शतकात वर्णव्यवस्था व सामाजिक रूढींचा बंधनकारक पगडा असताना त्यांनी निर्भयपणे तमाशा लोककलेत पाऊल टाकले आणि महिलांसाठी प्रेरणादायी आदर्श निर्माण केला. त्यांच्या स्मृतिदिनानिमित्त ग्रामपंचायतीने अनोख्या पद्धतीने त्यांना अभिवादन केले.''

कार्यक्रमास सरपंच सुभाष गडाख, भाजप जिल्हा पदाधिकारी काशिनाथ पावसे, ज्येष्ठ संपादक यादवराव पावसे, वृक्षमित्र गणपत पावसे, सरपंच सेवा संघाचे नेते बाबासाहेब पावसे, ग्रामसेवक हरिष गडाख, भाजप तालुका सरचिटणीस गणेश दवंगे, सदस्य भीमाशंकर पावसे, प्रा. बाबुराव पावसे, प्रा. आप्पासाहेब गडाख, कला सम्राज्ञी पवळा कला मंचाचे सचिव नितीनचंद्र भालेराव, डॉ. पवनकुमार गायकवाड, नामदेव पावसे, मुख्याध्यापक आर. पी. रहाणे यांसह इतर मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक अक्षय खतोडे, हरिभाऊ सहाणे, मंगल बिडवे तसेच संजय भालेराव, राजेंद्र दरोळे, सुयोग भालेराव, रवींद्र दारोळे, बच्चन भालेराव, समाधान भालेराव, अंकुश कोळगे, मुकेश दरोळे, प्रवीण गडाख, विकास दरोळे यांसह कला सम्राज्ञी पवळा कला मंच, महात्मा फुलेडॉ. आंबेडकरराजर्षी शाहू विचारमंच, भीमशक्ती तरुण मित्र मंडळ, जिल्हा परिषद शाळेचे विद्यार्थी, ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

आपला वाढदिवस
रक्तदानाने साजरा करा

